**तक्रारदारतर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए.जी.पालव यांचे मार्फत.**

०५. हे म्हणणे खरे नाही की, माझा पुर्वी ट्रॉलरचा व्यवसाय होता. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९० पासून माझा ट्रॉलरचा व्यवसाय होता. हे म्हणणे खरे आहे की, ट्रॉलरमधून मासेमारी केल्यानंतर त्याचा विक्री व लिलाव करणारे एजंट वेगळे असतात. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार हे माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदाराने केसबाबतची माहिती मला सांगितली होती. प्रस्तुतची केस काय आहे, कशासाठी दाखल केलेली आहे याबाबतची माहिती मला तक्रारदाराने दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझ्याकडून थेट मासे घेतले होते असे कधीही घडलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या प्रतिज्ञापत्रामध्ये जो काही सांगितलेला व्यवहार आहे, तो व्यवहार तक्रारदाराशी होता. हे म्हणणे खरे आहे की, कोळंबी माशामध्ये चार ते पाच प्रकार असतात. हे म्हणणे खरे आहे की, कुठल्या प्रकाराचे कोळंबी मासे दिले होते ही बाब माझ्या शपथपत्रामध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, एखादया प्रकारचे मासे दिल्यानंतर, कुठल्या प्रकाराचे मासे दिले, किती रक्कमेचे मासे दिले व किती तारखेला दिले याबाबत पावती तयार केली जाते, त्याची एक प्रत मालकाकडे व दुसरी प्रत एजंटकडे दिली जाते. हे म्हणणे खरे आहे की, ०७/०८/२०१७ ते दि. २०/०८/२०१७ या कालावधीमध्ये मासे दिले होते अशी दर्शविणारी कुठलीही चिठ्ठी मी प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल केलेली नाही.

प्रश्न – तुम्हाला किती तारखेला किती मासे देण्यात आले होते ही बाब तुमच्या शपथपत्रामध्ये नमूद करण्यासाठी कुठली अडचण होती का ?

उत्तर – लक्षात नाही.

०६. हे म्हणणे खरे आहे की, मासांच्या प्रत्येक दिवसाचा दर वेगवेगळा असतो. मला आठवत नसल्यामुळे दि. ०७/०८/२०१७ ते दि. २०/०८/२०१७ या कालावधीमध्ये कोळंबी मासाच्या प्रत्येक दिवसाचा दर काय होता हे नमूद केलेले नाही. हे मला माहित नाही

की, फिर्यादीने इतर मासेमारांकडून किती मासे घेतले, किती तारखेला घेतले व किती रक्कमेचे घेतलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने तयार केलेल्या शपथपत्रावरती मी सही केलेली आहे, सदर शपथपत्रातील माहिती मी दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी माझ्या ओळखीचे असल्यामुळे मी न्यायालयामध्ये साक्ष देण्यासाठी आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : १३/०१/२०२५

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण.